PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 2, ISSUE 3

# शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे वित्तीय व्यवस्थापन

**प्रा. एस. एस. उघडे**
रयत शिक्षण संस्था,
अ. आ. कॉलेज, मंचर पुणे,
महाराष्ट्र भारत

## प्रस्तावना

राज्यातील आदिवासी सुशिंक्षीत बेरोजगार, आर्थिकदृष्ट्या दुर्बल व दारिद्रय रषेखाली जीवन जगणा–या व्यक्तीना त्यांचे जीवनमान उंचावण्याकरीता महामंडळामार्फत विविध कर्ज योजना राबविण्यात येतात. शबरी मुख्य कार्यालय हे नाशिक या ठिकाणी असुन राज्यामधे 12 शाखा कार्यालये आहेत. शबरी आदिवासी वित व विकास महामंडळ मर्या नाशिक शाखा कार्यालय स्तरावरुण आदिवासी सुशक्षित बेरोजगाराना त्यांनी निवडलेल्या व्यवसाय धंदयासाठी कर्जावू आर्थिक सहाय्य करते. या मधे राष्ट्रीयकृत बॅकेमार्फत मार्जीन मनी उपलब्ध करुन देवून कर्ज वाटप केले जाते.

शबरी महामंडळ राष्ट्रीय अनुसुचीत जमाती वित व विकास महामंडळ नवि दिल्ली पूरस्कृत मूदत कर्ज योजना व्यवसाय धंदयासाठी लक्षांक(उददीष्ट) मंजुर करुण देवून लाभार्थी हिस्सा 10 शबरी महामंडळ कर्ज हिस्सा 15 व 75 हिस्सा एन. एस. डी. सी. नवि दिल्ली याचा हिस्सा उपलब्ध करुन देवून कर्ज वितरण केले जाते. या शाखा कार्यालयासाठी मुख्य कार्यालय नाशिक कडुन या कार्यालय अंतर्गत येणा–या एकुण 9 जिल्हयासाठी एकत्रीत लक्षांक या येत असतो व त्याप्रमाणे प्राप्त कर्ज प्रकरणांची मुल्यमापन समीती मसर्फत तपासणी,छाननी करुण सदर प्रकरणे मंजुरीसाठी मुख्य कार्यालय नाशिककडे पाठवली जातात. सन 2013–2014 या मागील वर्षामधे नाशिक मुख्यालयाकडुन विविध व्यवसायाकरीता लक्षांक आलेला होता. या प्राप्त लक्षांकानुसार ट्रॅक्टर–ट्राली, स्कुल बस, किराणा दुकाण, इ. कर्ज प्रकरणे या कार्यालय स्थरावर प्राप्त झालेला आहेत. या प्राप्त लक्षांकानुसार बहुतांष कर्ज प्रकरणे मंजुर होउन वाटप देखील झालेली आहेत. तरी सदर लक्षांक पुर्ततेच्या दृष्टीने प्राप्त प्रकरणे मंजुरीसाठी मा. प्रकल्प अधिकारी, एकात्मीक आदिवासी प्रकल्प नाशिक यांचेकडे मुल्यमापन समीती सभा आयोजीत करूण शिफारशीसाठी ठेवण्यात येतात.

## संशोधनाची उदिदष्टे

सदर शोधनिबंध पुढील उदिष्टांना संबोधुन लिहिला आहे.

1) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचा उददेशा अभ्यास.

2) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या अधिकृत भाग भांडवलाचा अभ्यास करणे.

3) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळातील खर्च निधीचा अभ्यास करणे.

## संशोधन पध्दती

प्रस्तुत शाोधनिबंधासाठी दुय्यम साधन सामग्रीचा वापर करण्यात आला आहें.

## शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचा उद्देश

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळा अंतर्गत अनुसुचित जमातीच्या व्यक्तीच्या आर्थिक विकासासाठी व कल्याणासाठी स्वतःच्या जबाबदारीवर संवेधानिक संस्था, कंपन्या, भागिदारी संस्था, व्यक्ती यांच्या सहयोगाने अशा संघटना, अभिकरणे यांच्या मार्फत कृशी उदयोग , लघु उदयोग, वाहतुक, वैदयकीय, अभियांत्रिकी सारखा इतर धंदा , व्यवसाय व्यापार, कार्यालय याच्या माध्यमातुन योजना आखणे, प्रचलित करणे , मदत करणे, सल्ला देणे,सहाय्य करणे, वित्तीय साहाय्य देणे, संरक्षण देणे आणि विविध उपक्रम हाती घेणे आर्थिक स्थिती आणि उत्पादन निर्मिती व्यवस्थापन आणि विपणन याच्या तंत्राचा विकास करण्यासाठी आणि त्यात सुधारणा करण्यात अनुसुचित जमातीच्या व्यक्तीस समर्थ बनवण्यासाठी कामधंदा, व्यवसाय, व्यापार, चालु करण्यासाठी भांडवल कर्ज मिळवण्याची साधणे साम्रग्री आणि तांत्रिक व्यवस्थापकीय सहाय्य देण्याची तरतुद करणे. तसेच आदिवासीच्या आर्थिक उन्नतीसाठी योग्य ते आवश्यक वाटणारे इतर कार्य करणे. त्यामुळे आदिवासी समाज आर्थिक दृश्ठया मजबूत होउन विकासाच्या दिशेने सर्वागीन बाजूनी वाटचाल करेल त्यांना बँकिग क्षेत्राची , समाजाची, व्यापार व्यवसायाची ओळख होउन त्यात प्रगती करावी या उददेशाने शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ भर आदिवासीच्या विकासासाठी कार्यरत आहे.

## शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या अधिकृत भागभांडवलाचा अभ्यास करणे.

PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 2, ISSUE 3

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ हे आदिवासी समाजाच्या आर्थिक सामाजीक विकासासाठी कंपनी कायदा 1956 अन्वये 15 जानेवारी 1999 रोजी स्थापन झालेली आहे. तेव्हापासुन या महामंडळाचे अधिकृत भागभांडवल हे रू 100 कोटी शासन निर्णयानुसार ठेवण्यात आले. यामध्ये 5: भागभांडवल राज्य शासनाचे आहे तर 49 : अधिकृत भागभांडवल केद्र शासनाकडुन उभारलेले आहे. या अधिकृत भागभांडवलाच्या आधारे हे शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ कार्यरत आहे.आदिवासी समाजाच्या विकासाच्या दृश्टीने त्यांना अनेक योजना मार्फत कर्ज पुरवठा करून व्यवसाय व्यापार सुरू करण्यासाठी साहाय्य केले जात आहे. महामंडळाचा व्याप हा महाराश्ट्रभर असल्यामुळे भांडवलाची कमतरता भासु लागली आदिवासी लाभार्थाच्या संख्येतही वाढ होउ लागली राज्यात या महामंडळाच्या 12 शाखा कार्यालयाअंतर्गत महामंडळाचे कार्य आर्थिक विकास होण्यासाठी चालु ठेवते.

शासन निर्णयानुसार शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे कार्यक्षेत्र वाढल्यामुळे दिनांक 24 ऑगस्ट 2004 नुसार महामंडळाचे अधिकृत भागभांडवल रू 100 कोटी वरून रू 200 कोठी इतके करण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे. यामध्ये 51: भाग भांडवल वर्गणी राज्य शासनाची आहे तर 49: भागभांडवल केंद्र शासनाकडुन उभारलेले आहे. त्यानुसार राज्य शासनाकडुन रू 102 कोटी आणि केंद्र शासनाने रू 98 कोटी इतके भागभांडवल या महामंडळाचे ठेवण्यात आले आहे.

कंपनी कायदा शासन निर्णयानुसार शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या अंदाजपत्रकात केलेली मागणी , शासन तरतुदीनुसार महामंडळास प्राप्त रक्कम व कमी प्राप्त भागभांडवलाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

## शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या अधिकृत भागभांडवल

(लाखात)

| सन | 51: राज्य शासन हिस्सा | | | | 49: केंद्र शासन हिस्सा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | शासन निर्णयानुसार केलेली अंदाजपत्रकीय मागणी | शासनाने केलेली तरतूद | महामंडळास प्राप्त रक्कम | कमी प्राप्त रक्कम | शासन निर्णयानुसार केलेली अंदाजपत्रकीय मागणी | शासनाने केलेली तरतूद | महामंडळास प्राप्त रक्कम | कमी प्राप्त रक्कम |
| 1998—99 | 500.00 | 500.00 | 500.00 | — | — | — | — | — |
| 1999—2000 | 1000.00 | 1000.00 | 1000.00 | — | — | — | — | — |
| 2000—2001 | — | — | — | — | — | — | — | — |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2001.2002 | – | – | – | – | – | – | – | – |
| 2002–2003 | – | – | – | – | – | – | – | – |
| 2003–2004 | 717.16 | 717.16 | 717.16 | – | 52.00 | 52.00 | 52.00 | – |
| 2004–2005 | 2000.00 | 110.00 | 110.00 | 1890 | 105.00 | – | – | 105.00 |
| 2005–2006 | 3890.00 | 250.00 | – | 3890 | – | – | – | – |
| 2006–2007 | 5890.00 | 377.32 | 50.00 | 5840 | 153.00 | – | – | 153.00 |
| 2007–2008 | 7840.00 | 400.00 | 400.00 | 7440 | 384.00 | – | – | 384.00 |
| 2008–2009 | 46.00 | 0.00 | 46.00 | 7440 | 384.00 | – | – | 384.00 |
| 2009–2010 | 400.00 | 400.00 | 400.00 | 1150 | – | – | – | – |
| 2010–2011 | 2650.00 | 1500.00 | 1500.00 | 150 | – | – | – | – |
| 2011–2012 | 1000.00 | 850.00 | 850.00 | 150 | – | 300.00 | 300.00 | – |
| 2012–2013 | 2296.00 | 1000.00 | 800.00 | – | 4527.00 | – | – | 4527.00 |
| 2013–2014 | 1000.00 | 1000.00 | 411.00 | 589.00 | 1000.00 | – | – | 1000.00 |
| एकुण प्राप्त भागभांडवल– | | | 6784.16 | – | – | – | 352.00 | – |

वरील तक्यात शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे अधिकृत भागभांडवल त्यामध्ये शासन निर्णयानुसार केलेली अंदाजपत्रकिय मागणी , शासनाने केलेली तरतूद महामंडळास प्राप्त रक्कम यामध्ये वाढ होताना दिसुन येते. सन 1998.99 मध्ये शासन निर्णयानुसार केलेली अंदाजपत्रकीय मागणी रू 500 लाख रूप्याची आहे. त्या अंतर्गत महामंडळास प्राप्त झालेली रक्कम रू 5 लाख आहे. त्यामध्ये वाढ होउन सन 2013.14 मध्ये शासन निर्णयानूसार केलेली अंदाजपत्रकीय मागणी रू 1000 लाख रूप्याची आहे. त्यावर शासनाने केलेली तरतूद रू 1000 लाख आहे. त्या अंतर्गत महामंडळास प्राप्त झालेली रक्कम 411 लाख रूपये आहे. अशा प्रकारे 2013.14 पर्यत शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळास एकुण स्थापनेपासून प्राप्त भागभांडवल 6784.16 लाख मिळालेले आहे.

## शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळातील खर्च निधीचा अभ्यास करणे.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाकडून आदिवासी समाजाच्या विकासासाठी कर्ज योजनेअंतर्गत कर्ज पुरवठा केला जातो हा सर्व खर्च महामंडळ केंद्र शासनाकडुन आणि राज्य शासनाकडुन प्राप्त झालेल्या निधीतुन करीत आहे. त्यातुन आदिवासी समाजाच्या आर्थिक विकासात भर पडत आहे. राज्य शासनाकडुन मंजुर तरतुद त्यानुसार प्राप्त तरतुद या मधुन किती निधी खर्च करावा याचा योग्य अंदाज या महामंडळाला व्यवस्थापकीय अनुदानातुन मिळते या तरतुदीमध्ये वाढ होउन खर्च निधीमध्ये वाढ होणे आपणास समाजाच्या विकासाच्या दृश्टीने तसेच त्याच्यात आर्थिक प्रगती आणि

बँकिग क्षेत्र व्यवसाय व्यापार क्षेत्र इ. क्षेत्राचे ज्ञान वाढुन या क्षेत्रात प्रगती होण्याच्या दृश्टीने हा खर्च निधी पुर्णपणे आदिवासी समाजावर करणे गरजेचे आहे. त्यामुळे त्याच्यातील दारिद्रयाचे प्रमाण बेकारीचे प्रमाण आपोआपच कमी होउन त्याचा विकास होण्यासाठी हे महामंडळ आपला खर्च निधी सातत्याने वाढवत आहे.

राज्य शासनाकडुन शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळासाठी मंजुर तरतुदी प्राप्त निधी त्यातुन किती निधी खर्च केला याचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

## राज्य शासनाकडुन मंजुर तरतुद, प्राप्त निधी, खर्च निधीचा तपशिल

(लाखात)

| अ.क. | तपशिल | 2009–2010 | | | 2010–2011 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मंजुर तरतुद | प्राप्त तरतुद | खर्च निधी | मंजुर तरतुद | प्राप्त तरतुद | खर्च निधी |
| 1 | भागभांडवल योजने अंतर्गत (4425.0688) | 2333.00 | 400.00 | 400.00 | 2650.00 | 1500.00 | 1500.00 |
| | (ब) केंद्र शासन | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 2 | व्यवस्थापकीय अनुदान (योजने अंतर्गत) (2425. 1359) | 300.00 | 300.00 | 300.00 | 350.00 | 350.00 | 350.00 |
| | **एकुण** | **2633.00** | **700.00** | **700.00** | **3000.00** | **1850.00** | **1850.00** |
| **अ.क.** | **तपशिल** | **2011–2012** | | | **2012–2013** | | |
| | | मंजुर तरतुद | प्राप्त तरतुद | खर्च निधी | मंजुर तरतुद | प्राप्त तरतुद | खर्च निधी |
| 1 | भागभांडवल योजने अंतर्गत (4425.0688) | 1000.00 | 850.00 | 0.00 | 1000.00 | 800.00 | 596.46 |
| | (ब) केंद्र शासन | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 2 | व्यवस्थापकीय अनुदान (योजने | 350.00 | 297.50 | 297.50 | 350.00 | 308.00 | 308.00 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | अंतर्गत) (2425. 1359) | | | | | | |
| | **एकुण** | **1350.00** | **1147.50** | **297.50** | **1350.00** | **1108.00** | **904.46** |
| **अ. क.** | **तपशिल** | **2013–2014** | | | | | |
| | | मंजुर तरतुद | प्राप्त तरतुद | खर्च निधी | | | |
| 1 | भागभांडवल योजने अंतर्गत (4425.0688) | 1000.00 | 411.00 | 411.00 | | | |
| | (ब) केद्र शासन | 0.00 | 0.00 | 0.00 | | | |
| 2 | व्यवस्थापकीय अनुदान (योजने अंतर्गत) (2425. 1359) | 750.00 | 310.00 | 310.00 | | | |
| | **एकुण** | **1750.00** | **0.00** | **0.00** | | | |

तक्यात दाखविल्या प्रमाणे राज्य शासनाकडुन आदिवासी सुशिक्षित आर्थिक दृष्टया मागासलेल्या समाजाच्या विकासासाठी हे शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ कार्य करते तसेच केंद्र शासनही त्याच पध्दतीने मदत करीत आहे या महामंडळाचे भागभांडवल तसेच व्यवस्थापकीय अनुदान 12 शाखा कार्यलय अंतर्गत ठरवीले जाते त्यानुसार व्यवस्थापनही केले जाते वार्षिक अहवाला मध्ये 12 शाखेतुन महाराष्ट्रभर कीती लाभार्थाना लाभ मिळाला याचाही विचार केला जातो म्हणुन महामंडळातुन खर्च निधीवर मोठया प्रमाणात खर्च करून आदिवासी समाजाच्या विकासा बरोबरच महामंडळाचा ही विकास घडुन येण्यास मदत होत आहे राज्यशासनाकडुन 2009 ते 2010 साठी आदिवासी समाजाच्या विकासासाठी रूप्ये 2333.00 लाखासाठी तरतुद मंजुर झाली त्यातुन रू 400.00 लाख तरतुद प्राप्त झाली तो सर्व निधी रू 400.00 लाख खर्च करण्यात आला यामध्ये बदल होउन 2010 ते 2014 मध्ये रू 1000.00 तरतुद मंजुर करण्यात आली त्यामधुन रू 411.00 लाख तरतुद प्राप्त झाली रू 411.00 लाख सर्व निधी खर्च करण्यात आला म्हणजेच महामंडळातील खर्च निधी हा सातत्याने आदिवासीच्या विकासासाठी वाढत आहे त्याचा फायदा महामंडळाला आणि आदिवासी समाजाला झालेला दिसुन येतो

## निष्कर्ष

महाराष्ट्र राज्यामध्ये शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाची 12 शाखा कार्यालये आहे महाराष्ट्रातील आदिवासी समाजाच्या विकासासाठी हे महामंडळ कार्यरत आहे. केंद्र शासन आणि राज्य शासनाअंतर्गत भाडवल उभारणी करून मुख्य कार्यालय नासिक या कार्यालयातुन सर्व शाखासाठी वित्त सहाय्य गरजेनुसार करून आदिवासी लोकाचे उत्पन्न रोजगार छोटे मोठे व्यवसाय यामध्ये वाढ करण्यरच्या दृष्टीने सातत्याने कार्य करते लाभार्थयाना आवश्यक कर्ज व्यवसायासाठी व्यापारासाठी गरजेनुसार सर्व शाखामंधुन वित्तीय व्यवस्थापन योग्य पध्दतीने होताना दिसुन येते त्याचा सकाारात्मक परीणाम महामंडळासाठी लाभार्थयासाठी मोठया प्रमाणात होत आहे महामंडळाचा उददेश साध्य होण्यासाठी भांडवल , निधी तसेच आवश्यक पैसाच्या वित्तीय व्यवस्थापनातुन योग्य ती मदत आणि लाभार्थयाचा सहभागही महामंडळाला मिळालेला दिसुन येत आहे योग्य वित्तीय व्यवस्थापनामुळे शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे सर्व कार्य चांगल्या पध्दतीने होउन महामंडळाचाही विकास झानेला दिसुन येतो.

## संदर्भ टिपा


1) Devgav, S.G. , (2011) Aadivasi Vikas Prashasan , Shree Sai Publication , Nagpur.
2) Varma , R. C. (2003 ) , ‘ Bharatiy Jamati’ Kaal, Aaj Amni Udya’, Prakashan Vibhag Mahiti Aani Prasaran Mantralay, Bhazat Sarkar.
3) Maharashtra Shasan Aadivasi Vikas Vibhag Booklet, . 2011-12.
4) Shabari Aadivasi Vitta Va Vikas Mahamandal , Ltd . Nashik , A Project By Government Of Maharashtra , Annual Report .
5) http ://www.mahashabri.com .
6) www.maha**shabri**.com/tribal.html
7) mahatribal.gov.in/htmldocs/links.html